# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः29.04.2024** **वारःसोमवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरू, सहाव्या टप्प्याची अधिसूचना जारी,
2. भारतीय तटरक्षक दलानं पोरबंदरजवळ केलेल्या कारवाईत पाकिस्तानी जहाजातून सहाशे कोटी रुपयांचे अंमली पदार्थ हस्तगत,
3. सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांच्या फ्रान्स दौऱ्यात उभय देशांमधील संरक्षण सहकार्य वाढवण्यावर चर्चा,
4. वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारतीय महिला संघाचा बांगलादेशवर विजय, आणि
5. तेलंगणसह पश्चिम बंगालचा काही भाग, बिहार, ओडिशा आणि झारखंडमध्ये उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरू असून मतदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. पंतप्रधान आणि भाजपचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल कर्नाटकात शिर्सी, दावणगेरे, बळ्ळारी आणि बेळगावी इथं प्रचारसभा घेतल्या. भारताला बलशाली बनवण्याची तसंच देश सुरक्षित आणि विकसित करण्याची ग्वाही त्यांनी या सभांमध्ये दिली. गेल्या 10 वर्षात आपल्या सरकारनं शेतकरी उत्पादक संघटनांच्या माध्यमातून अल्पभूधारक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि त्यांच्या शेतमालाला बाजारपेठ खुली होण्यास मदत केली आहे, असा दावाही त्यांनी केला.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी ओडिशामध्ये केंद्रपारा लोकसभा मतदारसंघातील सालीपूर इथं जाहीर सभेला संबोधित केलं. आपल्या पक्षाचं सरकार केंद्रात सत्तेवर आल्यास बेरोजगार युवकांसाठी 'पहली नौकरी पक्की योजना' सुरू करण्याचं आश्वासन त्यांनी या सभेत दिलं. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशात संभल आणि बरेली जिल्ह्यांमध्ये आपल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार केला. त्यांनी भाजपवर जोरदार तोफ डागत निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांमध्ये राज्यातील जनतेनं या पक्षाला चोख उत्तर दिलं असल्याचा दावा केला.

**6 वा टप्पा अधिसूचना**

निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणूक 2024 च्या सहाव्या टप्प्याची अधिसूचना जारी केली आहे. या टप्प्यात सहा राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील लोकसभेच्या 57 जागांसाठी मतदान होणार आहे. त्यामध्ये राजधानी दिल्लीतल्या सर्व सात जागांसह हरियाणा, उत्तरप्रदेश बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि झारखंडमधल्या जागांचाही समावेश आहे. या टप्प्याकरिता उमेदवारी अर्ज भरण्यासाठी 6 मे पर्यंत मुदत आहे. 7 मे रोजी अर्जांची छाननी होईल तर 9 मे पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येऊ शकतील. सहाव्या टप्प्यात 25 मे रोजी मतदान होईल. सर्व टप्प्यांची मतमोजणी 4 जून या दिवशी होणार आहे.

**आप प्रचार गीत**

आम आदमी पक्षानं आपल्या निवडणुकीच्या प्रचार गीतात जाहिरातीसंबंधीचे नियम आणि निवडणूक आयोगानं दिलेल्या दिशानिर्देशांनुसार बदल करावेत आणि आवश्यक ते बदल करून सुधारित गीत पुन्हा प्रमाणीकरणासाठी सादर करावं, असं आयोगानं या पक्षाला सांगितलं आहे. निवडणूक आयोगानं आम आदमी पक्षाच्या प्रचार गीतातल्या एका विशिष्ट शब्दाला आणि या

गीतामध्ये दाखवलेल्या दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या गजाआडच्या छायाचित्राला निवडणूक आयोगानं आक्षेप घेतला आहे. या गोष्टी आयोगाच्या दिशानिर्देशांचा आणि जाहिरात विषयक नियमांचा भंग करणाऱ्या असल्याचं म्हटलं आहे. मात्र आपल्या पक्षाच्या प्रचार गीतात आचारसंहितेचा कोणताही भंग केला नसून ते गीत तथ्यांवर आधारित असल्याचं आपच्या ज्येष्ठ नेत्या आतिशी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**खाण**

खाण मंत्रालयाच्या वतीनं उद्या नवी दिल्ली इथं महत्त्वाच्या 'खनिजांवरील प्रक्रिया' या विषयावर शिखर परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. महत्त्वाच्या खनिजांचा लाभ करून घेणं आणि त्यावरील प्रक्रिया यामध्ये सहकार्य वाढवणं, त्यासंबंधीच्या ज्ञानाची देवाणघेवाण करणं हा या दोन दिवसीय परिषदेचा मुख्य उद्देश आहे. वेगानं होत असलेल्या भारताच्या आर्थिक विकासाच्या पार्श्वभूमीवर आणि महत्त्वाकांक्षी स्वच्छ उर्जा उद्दिष्टांच्या पार्श्वभूमीवर ही शिखर परिषद आयोजित करण्यात येत असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**तटरक्षक**

भारतीय तटरक्षक दलानं काल गुजरातमधील पोरबंदर इथं केलेल्या संयुक्त कारवाईत एका पाकिस्तानी बोटीतून सहाशे कोटी रुपये किंमतीचे 86 किलो अंमली पदार्थ हस्तगत केले असून 14 जणांना अटक केली आहे. या संदर्भातील अधिकृत प्रसिद्धी पत्रकानुसार,तटरक्षक दलानं गुजरातचं दहशतवाद विरोधी पथक आणि अंमली पदार्थ नियंत्रण विभागाच्या मदतीनं अरबी समुद्रात रात्रीच्या वेळी ही कारवाई केली. या कारवाईत अटक करण्यात आलेल्यांना पुढील चौकशीसाठी पोरबंदर इथं आणण्यात आलं आहे.

**सरसेनाध्यक्ष**

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी नुकताच फ्रान्सचा सर्वंकष दौरा केला. त्यांच्या या भेटीमुळे भारत आणि फ्रान्स यांच्यातील दीर्घकालीन धोरणात्मक भागीदारीवर शिक्कामोर्तब झालं असून दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संरक्षण सहकार्याला आणखी बळकटी मिळाली आहे, असं संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

सरसेनाध्यक्षांनी त्यांच्या दौऱ्यात फ्रान्सच्या सशस्त्र दलाचे मंत्री पॅट्रिक पेलॉक्स आणि सशस्त्र सेना मंत्री लेफ्टनंट जनरल व्हिन्सेंट गिरॉ यांच्याशी उभय देशांमधील संरक्षणविषयक सहकार्य आणखी वाढवण्याविषयी तसंच समान हिताच्या संरक्षणविषक मुद्द्यांवर चर्चा केली. त्यांनी फ्रान्सच्या संरक्षण उद्योगातील मान्यवरांशीही चर्चा केली. त्यामध्ये दसॉ, साफ्रान, थेल्स अलेनिया स्पेसचाही समावेश आहे.

**इस्रायल- हमास संघर्ष**

इस्रायलला दक्षिण गाझा शहरावर हल्ला करण्यापासून रोखू शकेल असा अमेरिका हा एकमेव देश असल्याचं पॅलेस्टिनचे अध्यक्ष महमूद अब्बास यांनी म्हटलं आहे. सध्या गाझा शहराच्या दक्षिण भागात दहा लाखांहून अधिक लोक आश्रय घेत आहेत. कोणत्याही प्रकारचा हल्ला झाल्यास पॅलेस्टिनींना गाझा सोडून जावं लागेल, असं अब्बास म्हणाले. ओलिसांची मुक्तता करण्याचा काही करार झाल्यास इस्रायल गाझामध्ये शिरण्याचा फेरविचार करेल, असं इस्रायलच्या परराष्ट्र मंत्र्यांनी शनिवारी म्हटलं होतं. इस्रायल आणि हमासच्या भूमिकेत मोठी तफावत असल्यानं इजिप्त आणि कतारच्या मध्यस्थीनं दीर्घकाळ पासून सुरू असलेली बोलणी थांबली होती. मात्र ताज्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी हमासनं काल आपल्या प्रतिनिधींना कैरो इथं पाठवण्यास तयारी दर्शवली आहे.

**राज्यपाल**

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे रोगनिदान आणि उपचार यामध्ये क्रांतिकारी बदल होत आहेत. विशेषतः विविध प्रकारचे कर्करोग, हृदयविकार, त्वचा रोग, दंत चिकित्सा या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता परिवर्तनकारी बदल होत आहेत. मात्र या तंत्रज्ञानामुळे जनसामान्यांचा रोगनिदानाचा आणि उपचाराचा खर्च कमी झाला पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी काल मुंबईत

केलं. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि बॉम्बे हॉस्पिटल यांनी आयोजित केलेल्या 'आरोग्यसेवा आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावरील एक दिवसाच्या चर्चासत्राचं उद्घाटन राज्यपाल बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत काल बॉम्बे हॉस्पिटलमध्ये झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**अपघात**

काश्मीर च्या पहाडी भागात श्रीनगर लेह महामार्गावर, पर्यटकांना घेऊन जाणार एक वाहन सिंध नाल्यात पडून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. मध्य काश्मीरमधील गंदरबल जिल्ह्यात गगनगीर सोनमर्ग भागात ही दुर्घटना घडली. ती कळताच सर्व सुरक्षा दलाच्या जवानांनी बचाव कार्य सुरू केल आणि नाल्यातून चार मृतदेह बाहेर काढले. मात्र या भागात मुसळधार पाऊस सुरू झाल्याने बचाव कार्य तूर्तास थांबवण्यात आल आहे

**महिला क्रिकेट**

भारत आणि बांग्लादेश महिला क्रिकेट संघा दरम्यान बांगलादेशतील सेलहेट इथ सुरू असलेल्या 20 षटकांच्या 5 सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना काल भारताने 44 धावांनी जिकला. भारतीय महिला संघाने काल नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि बंगलादेश संघापुढे 146 धावांच आव्हान ठेवल. मात्र बांगला देशाचा संघ 20 षटकांत 8 गड्यांच्या मोबदल्यात केवळ 101 धावाच करू शकला. भारतीय महिला गोलंदाजांनी केलेल्या भेदक कामगिरीमुळे हा विजय साकार झाला. यामध्ये रेणुका सिंग ठाकूर हिने 3 गडी तर पूजा वस्त्रकर हिने 2 गडी बाद केले. फलंदाजीत भारताच्या यस्तीका भाटिया हिने 29 चेंडूत 36 तर शेफाली वर्मा हिने 22 चेंडूत 31 धावा करून हा विजय साकार केला. बांगलादेशाची गोलंदाज रबिया खान हिने 3 गडी बाद केले. या मालिकेतला दुसरा 20 षटकांचा सामना उद्या सेलहेट इथच खेळला जाणार आहे.

**हवामान**

देशात विविध भागात उष्णतेचा प्रकोप सुरूच असून पुढील 3 दिवस पश्चिम बंगालमधील गंगेच्या खोऱ्यातील प्रदेश, बिहार, ओडिशा आणि झारखंडमध्ये उष्णतेची लाट  कायम राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. तर रायलसीमा, कर्नाटक, तामिळनाडू,आंध्र प्रदेश, तेलंगण, केरळ आणि पूर्व उत्तरप्रदेश या राज्यातील तुरळक भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**तेलंगण उष्णता लाट**

तेलंगणमध्ये 33 जिल्ह्यांपैकी 15 जिल्ह्यांमध्ये हा संपूर्ण आठवडा अथवा त्यापेक्षा जास्त दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या दरम्यान या 15 जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 41 ते 45 अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. तेलंगण राज्यातील काही भागात काल कमाल तापमान 45 अंश सेल्सिअस पेक्षा जास्त होत. पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेसंदर्भात हैद्राबादच्या हवामान विभागाने पिवळा बावटा जारी केला आहे. तर 1 मे रोजी नारंगी बावटा जारी केला आहे. दरम्यान, राज्यात तुरळक ठिकाणी येत्या दोन दिवसांत पाऊस पडण्याची शक्यता ही हैद्राबाद हवामान विभागाने वर्तवली आहे. येत्या दोन दिवसांत पूर्व भारतातील कमाल तापमानांत 2 अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. तर अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मिजोराम, मणीपुर या राज्यात येत्या बुधवारपासून जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.